# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ११/०४/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -३१२** **विषय क्रमांक –३१२**

**दिनांक- ११/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१२**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/कावि/४५/२०२३ दि.०६/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठ.क्र.१३३६ दि.१४/३/२०२३ अन्वये, डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी, च-होली या भागात पाण्याची जलवाहिनी टाकणे, आर.सी.सी., ई.एस.आर. व जी.एस.आर. बांधणे (भाग-१) चे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३१२**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पापु/कावि/४५/२०२३ दि.०६/०३/२०२३ आणि मा.स्थायी समिती ठ.क्र.१३३६ दि.१४/३/२०२३ अन्वये, डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी, च-होली या भागात पाण्याची जलवाहिनी टाकणे, आर.सी.सी., ई.एस.आर. व जी.एस.आर. बांधणे (भाग-१) चे काम मे.गुडविल कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार करीत असून त्यांना निविदा क्र.११/४-१/२०१९-२० नुसार दि.२८/१२/२०२० अन्वये कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामामध्ये एकूण ८ ईएसआर व १ जीएसआर बांधणेचा समावेश आहे. तसेच ४०० मिमी, ५०० मिमी, ६०० मिमी, ७०० मिमी व ८०० मिमी. व्यासाच्या एकूण ११७०९ मी. लांबीच्या जलवाहिनी टाकणेच्या कामाचा समावेश असून सदरील काम प्रगतीपथावर आहे. सदर निविदे अंतर्गत एकूण ८ ईएसआर व १ जीएसआर बांधणे प्रस्तावित आहे, परंतु आजतागायत नगर रचना विभागामार्फत फक्त ४ ईएसआर व १ जीएसआर च्या जागा ताब्यात मिळालेल्या आहेत. याबाबत नगर रचना विभागास वारंवार पत्र देण्यात आलेले आहेत तसेच जागा ताब्यात मिळणेबाबत नगर रचना विभागासोबत बैठकी घेण्यात आलेले आहेत. सदरील बांधण्यात येत असलेल्या ४ ईएसआर व १ जीएसआर पैकी निविदेत प्रस्तावित असलेल्या वडमुखवाडी (ब) येथील आरक्षण ताब्यात नसल्याने स्टेडीअम पार्किंग मोशी येथे प्रस्तावित टाकी बांधण्यासाठी जागा देण्यात आली. सद्यस्थितीत ४ ई.एस.आर. व १ जी.एस.आर. बांधणेसाठी जागा मनपाच्या ताब्यात मिळालेली असून कामे प्रगतीपथावर आहेत. सद्यस्थितीत चालू असलेल्या प्रकल्पांतर्गत पाण्याच्या टाक्या बांधणे व टाक्या भरण्याकामी फीडरमेन पाईप टाकण्याच्या कामाचा समावेश असून आजतागायत १०१८० मी. पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. सदर कामामध्ये टाक्यांच्या वितरण व्यवस्थेचा समावेश केलेला नाही, त्यामुळे डूडूळगाव-२, च-होली सी (GYM)., वडमुखवाडी-ब (स्टेडीअम)., चोविसावाडी-२ (बुर्डे वस्ती) येथील ई. एस. आर. व प्राईड सिटी येथील जी. |

| | |
|---|---|
| | एस. आर. चा वापर करण्यासाठी व टाक्यातून पाणीपुरवठा करण्यासाठी Outlet व Distribution पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे, जेणेकरून पुढील काळात पाणी पुरवठा करणे सोयीचे होईल. तसेच वडमुखवाडी (ब) येथील टाकी भरण्याकामी Inlet व पाणीपुरवठा करण्यासाठी Outlet टाकणे हे काम एकत्र केल्यास त्यासाठी लागणा-या खोदकाम, रस्ता पूर्ववत करणे इत्यादी खर्चात बचत होईल. सदरील कामाचे ठेकेदार मे.गुडविल कन्स्ट्रक्शन यांनी टाक्यांचे Outlet व Distribution पाईपलाईन टाकणेस निविदेतील मंजूर दरानुसार काम करणेस तयारी दर्शवलेली आहे. तसेच चालु दरपत्रकानुसार DI, MS व HDPE पाईपचे दर वाढलेले असून व नवीन निविदा काढून काम केल्यास र.रु.१४.३६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे व सदर काम मंजूर निविदेतील दरानुसार केल्यास र.रु.११.८४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे, या नुसार असे दिसून येते कि नमूद काम हे निविदेतील मंजूर दरानुसार केल्यास र.रु.२.५२ कोटी इतकी बचत अपेक्षित आहे, हे महानगरपालीकेच्या आर्थिकदृष्ट्या हिताचे आहे. सदर बाब लक्षात घेता टाक्यांचा वापर करणेसाठी व पाणीपुरवठा करण्यासाठी Outlet व Distribution पाईपलाईनचे सुमारे ६००० मी. चे काम मे.गुडविल कं. यांच्याकडून करून घेणे योग्य वाटते. सदरील काम पूर्ण करणेसाठी र.रु.११.८४ कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. तरी वरील कामाचे मुळ अंदाजपत्रकीय र.रु.४८.३४ कोटी इतकी असून वाढीव र.रु.११.८४ कोटी सह एकूण र.रु.६०.१८ कोटी इतकी होत आहे. तसेच सदर काम ३.७२% जादा असून निविदा अटी व शर्तीनुसार (Escalation इत्यादी) र.रु.२२.८१ कोटी सह एकुण र.रु.८२.९९ कोटी खर्च होत आहे, तरी एकुण र.रु.८२.९९कोटी खर्चास तसेच नमूद केलेल्या कामातील स्थळ बदल प्रस्तावास व र.रु.८२.९९ कोटी इतक्या सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणेकामी मा. महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१३** **विषय क्रमांक –३१३**

**दिनांक- ११/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१३**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जा.क्र.आमुका/२/कावि/१०१/२०२३ दि.५/४/२०२३ अन्वये, शहरातील निवासी आस्थापनांव्यतिरिक्त इतर सर्व आस्थापनांचे “उपयोगकर्ता शुल्क” वसुलीकरिता सदर सर्व आस्थापना ह्या बिगरनिवासी म्हणून गृहीत धरणे व त्याकरिता उपयोगकर्ता शुल्काची सुधारित रक्कम निश्चित करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३१३**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. जा.क्र.आमुका/२/कावि/१०१/२०२३ दि.५/४/२०२३ अन्वये, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत दि.११ जुलै २०१९ रोजी शासन निर्णय |

निर्गत करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत तयार करण्यात आलेले उपविधी आदेशाचे दिनांकापासून राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींसाठी लागू झालेले असून त्याकरिता महापालिका सभा ठरावाची अथवा स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यक नसल्याचे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार दि.१ जुलै २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेची अंमलबावणी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर उपविधीमध्ये अनुसूची – १, भाग अ मध्ये “उपयोगकर्ता शुल्क”निर्धारित करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| | | **महानगरपालिका** | |
|---|---|---|---|
| **क्र.** | **वर्गवारी** | **अ व ब वर्ग** | **क व ड वर्ग** |
| | घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी | **(रक्कम रुपये प्रतिमहा)** | |
| १ | प्रति घर | ६० | ५० |
| | **व्यावसायिक आस्थापना** | | |
| २ | दुकाने, दवाखाने इत्यादी | ९० | ६० |
| ३ | शोरुम<br><br>(उपकरणे / फर्निचर / ऑटोमोबाईल / इलेक्टॉनिक्स इ.) | १६० | १२० |
| ४ | गोदामे | १६० | १२० |
| ५ | उपहारगृहे व हॉटेल | १६० | १२० |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | २०० | १६० |
| | **रुग्णालये** | | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | १६० | १२० |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | २४० | १८० |
| | **संस्था** | | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतीगृहे | १२० | ९० |
| १० | धार्मिक संस्था | १२० | ९० |
| ११ | शासकीय / निमशासकीय कार्यालये | १२० | ९० |
| १२ | विवाह कार्यालये / मनोजरंजन सभागृहे / एकपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १३ | खरेदी केंद्र / बहुपडदा चित्रपटगृहे | २००० | १००० |
| १४ | फेरीवाले | १८० | १५० |
| १५ | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा / सत्संग / खाद्य महोत्सव / फटाक्याचे दुकान | स्थानिक स्वराज्य संस्थांनी मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारित करावे | |

आदेश क्र. आमुका/२/कावि/४२०/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता लागू करण्यात आलेले आहेत. सदर आदेशामध्ये नमूद असलेल्या सर्व आस्थापनांकडून “उपयोगकर्ता

शुल्क”वसुलीची कार्यवाही १ एप्रिल २०२३ पासून मिळकत कराच्या बिलामधून करण्यात येणार आहे. तथापि, करसंकलन विभागाकडे मालमत्ता कराच्या वसुलीकरिता निवासी, बिगरनिवासी व मिश्र या प्रकारांमध्ये मिळकतींचे विभाजन करण्यात आलेले असून दुकाने, दवाखाने, शोरुम (उपकरणे, फर्निचर, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स इ.), हॉटेल्स, रुग्णालये, शासकीय कार्यालये, चित्रपट गृहे, विवाह कार्यालये इ. करिता स्वतंत्र विभाजन करण्यात आलेले नाही. सदर सर्व आस्थापनांची बिगरनिवासी या शिर्षकाखाली मिळकत कर आकारणी केली जाते व मिळकत कराचे बिलामध्ये देखील तशाच प्रकारची विभागणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे मिळकत कराचे माध्यमातून “उपयोगकर्ता शुल्क”वसुलीकामी वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या निवासी आस्थापनांव्यतिरिक्त इतर सर्व आस्थापना ह्या बिगरनिवासी म्हणून गृहीत धरणे व त्यानुसार त्याची बिगरनिवासी शिर्षकाखाली वर्गीकृत करणे आवश्यक आहे.

घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी नुसार निवासी आस्थापनांकरिता र.रु. ६०/- प्रतिमहा या दराने “उपयोगकर्ता शुल्क”आकारण्यात येणार आहे. तथापि इतर सर्व आस्थापनांकरिता र.रु.९०/- प्रतिमहा ते र.रु.२०००/- असे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे निवासी आस्थापनांव्यतिरित्त असलेल्या दुकाने, दवाखाने, शोरुम (उपकरणे, फर्निचर, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स इ.), गोदामे, उपहारगृहे व हॉटेल्स, राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वसतीगृहे, धार्मिक संस्था शासकीय / निमशासकीय कार्यालये, विवाह कार्यालये / मनोजरंजन सभागृहे / एकपडदा चित्रपटगृहे, खरेदी केंद्र / बहुपडदा चित्रपटगृहे या सर्व आस्थापनांना बिगरनिवासी शिर्षकाखाली खालीलप्रमाणे “उपयोगकर्ता शुल्क”आकारणी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | क्षेत्रफळ | उपयोगकर्ता शुल्क र.रु. |
|---|---|---|
| १) | १००० चौ.फुट पर्यंत | ९०/- |
| २) | १००१ ते ३००० चौ.फुट | १२०/- |
| ३) | ३००१ ते ५००० चौ.फुट | १६०/- |
| ४) | ५००१ चौ.फुट पेक्षा जास्त | २००/- |

तरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी नुसार निवासी आस्थापनांव्यतिरिक्त असलेल्या दुकाने, दवाखाने, शोरुम (उपकरणे, फर्निचर, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स इ.), गोदामे, उपहारगृहे व हॉटेल्स, राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वसतीगृहे, धार्मिक संस्था शासकीय / निमशासकीय कार्यालये, विवाह कार्यालये / मनोजरंजन सभागृहे / एकपडदा चित्रपटगृहे, खरेदी केंद्र / बहुपडदा चित्रपटगृहे या सर्व आस्थापनांना बिगरनिवासी शिर्षकाखाली वर नमूद केलेल्या

| | |
|---|---|
| | प्रतिमहा दराने "उपयोगकर्ता शुल्क"आकारणेस तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अंशत: बदल करण्यात येऊन शुन्य कचरा प्रकल्पांतर्गत सामान्य करात सवलतीस पात्र असलेल्या रहिवासी / निवासी मालमत्तांना घनकचरा व्यवस्थापन उपयोगकर्ता शुल्क रकमेतून संपूर्ण सुट / सवलत देण्यात येईल अशी सुधारणा करणेकामी मा. महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१४** **विषय क्रमांक –३१४**

**दिनांक- ११/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१४**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.आमुका/४/कावि/८२/२०२३ दि.५/४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगिक आस्थापनांना उपयोगकर्ता शुल्क आकारणे बाबत. |
| **ठराव क्र. ३१४**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.आमुका/४/कावि/८२/२०२३ दि.५/४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरामध्ये असलेल्या औद्योगिक आस्थापनांमार्फत त्यांचे परिसरातील कचरा संकलनाकरिता महानगरपालिकेमार्फत यंत्रणा उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन आरोग्य विभागासमवेत औद्योगिक आस्थापनांचे संघटनांशी चर्चा करणेकामी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये शहरातील औद्योगिक आस्थापनांचे सर्वेक्षण करुन रुट प्लॅन तयार करण्याचे कचरा संकलन करणा-या संस्थांना निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार निश्चित झालेल्या रुट प्लॅन प्रमाणे दि.२ जून २०२२ पासून शहरातील औद्योगिक आस्थापनांचा अघातक कचरा उचलण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच औद्योगिक परिसरांमधील रस्त्यांवर जमा होणारा कचरा पूर्वीपासून महानगरपालिकेमार्फत संकलित करण्यात येत आहे.<br><br>नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेमार्फत राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत दि.११ जुलै २०१९ रोजी शासन निर्णय निर्गत करण्यात आलेला असून आदेश क्र. आमुका/२/कावि/४२०/२०१९ दि.१६/०८/२०१९ अन्वये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार निवासी आस्थापनांना र.रु.६०/- प्रतिमहा व बिगरनिवासी आस्थापनांना र.रु.९०/- प्रतिमहा इतकी रक्कम आकारण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर उपविधीनुसार औद्योगिक आस्थापनांकडून आकारावयाच्या उपयोगकर्ता शुल्काच्या रकमेचा उल्लेख करण्यात आलेला नाही.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत वरील सर्व निवासी व बिगरनिवासी आस्थापनांकडून उपयोगकर्ता शुल्क वसुलीची कार्यवाही १ एप्रिल २०२३ पासून मिळकत कराच्या बिलामधून करण्यात येणार आहे. त्यानुसार औद्योगिक आस्थापनांकडून संकलित करण्यात येणा-या कच- |

| | |
|---|---|
| | याचे व्यवस्थापनासाठी त्यांचेकडून देखील उपयोगकर्ता शुल्क आकारणे आवश्यक आहे. तथापि, सदर कचरा हा केवळ औद्योगिक अघातक कचरा असून त्यामध्ये कोणताही घातक कचरा असणार नाही याबाबत औद्योगिक आस्थापनांनी खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.<br><br>औद्योगिक संघटनांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये औद्योगिक आस्थापनांकडील अघातक कचरा संकलनासाठी महानगरपालिकेमार्फत ठराविक रक्कम प्रतिमहा आकारण्याबाबत एकमत झालेले आहे. त्यानुसार दि.१ एप्रिल २०२३ पासून शहरातील औद्योगिक आस्थापनांचे मिळकत कराचे बिलाद्वारे खालीलप्रमाणे रक्कम निश्चित करुन त्यानुसार आकारणी करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | क्षेत्रफळ | उपयोगकर्ता शुल्क र.रु. |
|---|---|---|
| १) | १००० चौ.फुट पर्यंत | १००/- |
| २) | १००१ ते ३००० चौ.फुट | २००/- |
| ३) | ३००१ ते ५००० चौ.फुट | ३००/- |
| ४) | ५००१ चौ.फुट पेक्षा जास्त | ५००/- |

| | |
|---|---|
| | तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील औद्योगिक आस्थापनांचे अघातक कचरा व्यवस्थापन कामकाजापोटी त्यांचेकडून दरमहा वर नमूद केलेल्या दरानुसार मिळकत कर बिलाचे माध्यमातून आकारणी करणेकामी मा. महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३१५** **विषय क्रमांक –३१५**

**दिनांक- ११/०४/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३१५**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/१२५/२०२३<br>दि.११/०४/२०२३ अन्वये, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री.छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) समाधी ठिकाणी, तुळापुर येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता आर्थिक सहाय्य अदा करणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे बाबत. |
| **ठराव क्र. ३१५**<br>**दिनांक-११/०४/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/१२५/२०२३ दि.११/०४/२०२३ अन्वये, सरपंच, ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत, तुळापुर ता.हवेली, जि.पुणे यांनी,श्री क्षेत्र तुळापूर येथे स्वराज्यरक्षक धर्मवीर श्री. छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ आहे. दरवर्षी फाल्गुन अमावस्येला बलिदान दिन / स्वराज्यरक्षक धर्मवीर श्री.छत्रपती श्री. संभाजी महाराजांची पुण्यतिथी म्हणून साजरी केली जाते. या ठिकाणी पिंपरी चिंचवडसह राज्यातील विविध भागातून जनता दर्शनासाठी येत असते. ग्रामपंचायतीतील सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी अभावी अडचणी येत असतात. तरी स्वराज्यरक्षक धर्मवीर श्री. छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान दिनानिमित्त श्री क्षेत्र तुळापूर ग्रामपंचायतीस महाराजांचे समाधी स्थळाचे ठिकाणी मंडप व्यवस्था,लाइट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हार-फुले इ. करिता |

| | |
|---|---|
| | रु.२९९०००/- खर्चाची रक्कम मनपा हद्दीबाहेर महाराष्ट्र महापालिका अधीनियमाचे कलम ८९ नुसार उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळालेली आहे, तरी दि. २१/०३/२०२३ या दिवशी स्वराज्यरक्षक धर्मवीर श्री.छत्रपती संभाजी महाराजांची पुण्यतिथी असुन लवकरात लवकर निधी प्राप्त व्हावा ही विनंती आहे असे कळविले आहे.<br><br>मा.महापालिका सभा सदस्य ठराव क्र.६१९ दि.१८/३/२०२१ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/७/कावि/७६/२०२२ दि. २८/०३/२०२२ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण- ९, नगरपालिका निधी व अन्य निधी नगरपालिका निधी, यामध्ये कलम ८९ चे अधीन राहून,ग्रामसेवक,ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन समाधी ठिकाणी तुळापुर यांना आर्थिक सहाय्य र.रु.२,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) माहिती व जनसंपर्क विभाग यांच्या **"राष्ट्र पुरुष /महा पुरुषांच्या विचारांचा प्रचार करणे (प्रबोधनात्मक उपक्रम)"**या लेखाशिर्षावर खर्ची टाकूनआर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता दिलेली आहे .<br><br>मा.महापालिका सभा सदस्य ठराव क्र.६७१ दि.२०/०८/२०२१अन्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) समाधी ठिकाणी, तुळापुर येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता अनुदान, आर्थिक सहाय्य अदा करणेकामी, "ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) कार्यक्रमासाठी द्यावयाचे अनुदान" असे नव्याने लेखाशिर्ष करणेस व या लेखाशिर्षावर सन २०२१-२२ पासून दरवर्षी र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख फक्त) इतकी तरतूद करणे या करिता उपयोगिता प्रमाणपत्र/विनियोग दाखला, खर्चाच्या पावत्या सादर करणे व दरवर्षी मान्यता दिलेली आहे.<br><br>तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण- ९ नगरपालिका निधी व अन्य निधी, नगरपालिका निधी यामध्ये कलम ८९ चे अधीन राहून ,ग्रामविकास अधिकारी , ग्रामपंचायत, तुळापुर ता. हवेली, जि. पुणे यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन कार्यक्रमास समाधी ठिकाणी तुळापूर येथे मंडप व्यवस्था ,लाईट व्यवस्था पिण्याचे पाणी , हारफुले इ.करिता, करारनामा करून, सदरचे आर्थिक सहाय्य र.रु. २,९९,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख नव्यान्नव हजार फक्त) हे क्रीडा विभागाकडील **"ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन कार्यक्रमासाठी द्यावयाचे अनुदान"** या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद मधून खर्ची टाकणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**